ISSN- 2349-638x

Impact Factor
7.149

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed and Indexed Journal

## Special Issue

## Sustainable Development in Science, Social Sciences and Languages

30th May 2021

Special Issue - 88

Chief Editor:
Mr. Pramod P. Tandale

Executive Editor
Dr. Mangalkumar R. Patil
Principal,
Dr. Ghali College, Gadhinglaj

Co-Editor
Mr. Ashvin G. Godghate
Dr. Dattatray N. Waghmare
Dr. Nilesh. K. Shelake

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed And Indexed Journal

ISSN 2349-638x

Impact Factor 7.149

Website :- www.aiirjournal.com


## Theme of Special Issue

**Sustainable Development in Science, Social Sciences and Languages**


## Chief Editor

**Mr. Pramod P. Tandale**

## Executive Editor

**Dr. Mangalkumar R. Patil**

Principal,

Dr. Ghali College, Gadhinglaj

## Co-Editor

**Mr. Ashvin G. Godghate**

**Dr. Dattatray N. Waghmare**

**Dr. Nilesh. K. Shelake**

Special Issue No.88
Theme of Special Issue : Sustainable Development In Science, Social Sciences and Languages


| Sr.No. | Name of the Aurhor | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 134. | प्रा. डॉ. एम. आर. खोत | बालकामगार आणि कायदेशीर तरतुदी | 610 |
| 135. | अभिजीत बाळासो गिरी<br>डॉ. जाधव म.ल. | उच्चशिक्षण आणि संशोधनाकडे वाटचाल | 616 |
| 136. | कैलास सत्यवान शेलार<br>डॉ. आदिनाथ मोरे | शाश्वत आर्थिक विकास | 620 |
| 137. | श्रीमती. आर. व्ही. पाटील | जागतिक तापमान वाढ - एक समस्या | 626 |
| 138. | प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचा ऋणानुबंध | 632 |
| 139. | डॉ. एच. एस. कुचेकर | महिला सक्षमीकरण : भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग | 636 |
| 140. | डॉ. सरिता बाबासाहेब बिडकर | 'तीसरी ताली' में लैंगिक समानता के लिए किन्नरों का संघर्ष | 642 |
| 141. | डॉ. धनश्री खटावकर<br>प्रा. सी. जे. भारसकळे | इस्लामपूरमधील प्रवासी रिक्षा चालकांना उध्दभवणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय | 647 |
| 142. | प्रा.शेख आलम गफूर | भारतातील अंतर्गत श्रमिक स्थलांतर : धोरणे आणी उपाय | 653 |
| 143. | डॉ.गजानन बापुराव ठाकरे | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | 659 |
| 144. | सचिन आर. दर्पे | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्थलांतराच्या कारणांचा आणि परिणामांचा अभ्यास | 665 |
| 145. | डॉ. मारुती अर्जुन केकाणे | कोवीड १९ मुळे डिजिटल मीडियाची उच्च शिक्षणातील भूमिका आणि उपयोग | 669 |
| 146. | प्रा. मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ | ठाणे - पालघर जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास | 674 |
| 147. | सीमा यादव<br>डॉ.मृत्युन्जय मिश्रा | प्राथमिक शिक्षा मे मौलिक अधिकार के महत्व का अध्ययन | 681 |
| 148. | श्री चंद्रहास लक्ष्मण हिप्परकर<br>डॉ. विनय दत्तात्रय धोंडगे | शाश्वत विकासाची ध्येये | 683 |
| 149. | डॉ.अर्चना काटकर-सोनवणे | भटक्या विमुक्तांचे आत्मकथन | 689 |
| 150. | प्रा. डॉ. झाकीरहुसेन हाकीम संदे | मानवाधिकार संहिता आणि भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार यांचा तौलनिक अभ्यास | 694 |
| 151. | प्रा. प्रकाश जमदाडे | ब्रिटिश काळातील शैक्षणिक आयोग आणि स्त्री शिक्षण | 699 |

Special Issue No.88
Theme of Special Issue : Sustainable Development In Science, Social Sciences and Languages

# मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचा ऋणानुबंध

**प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**
सहाय्यक प्राध्यापक , ( मराठी विभाग )
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.
ई-मेल - vishallingayat28@gmail.com
मो. नं. – ७५८८०२०२९०

---

प्रस्तावना :-

मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचे एक अतूट असे नाते आहे. त्यामुळेच मराठी साहित्यातून पूर्वीपासूनच निसर्गाचे किंबहुना पर्यावरण संवर्धनाचे वर्णन करण्यात आले आहे. त्यात मुख्यतः कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन यांचा समावेश होतो. तसे बघितल्यास मराठी साहित्याच्या समकालीन प्रवाहात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञान साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य यांचाही समावेश होतो. परंतु त्यातही मराठी कविता ही पर्यावरण, परिसंस्था, नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरण शास्त्र यात अधिक नटलेली आहे. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण जगामध्ये अनेक प्रकारच्या चळवळी, चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा आयोजित केल्या जातात. भारतातही या संदर्भात पर्यावरणाच्या रक्षणासाठी "चिपको आंदोलन" सारखी चळवळ झालेली बघावयास मिळते. प्राचीन काळापासून मराठी साहित्यात पर्यावरण व निसर्गावर बरेचसे लेखन झाले आहे. त्यात मराठी साहित्यातील 'कविता' या वाङमय प्रकाराचे योगदान फारच महत्त्वाचे ठरते. पर्यावरणातील प्रत्येक घटक हा मनुष्याच्या जीवनाशी एकरूप झालेला आहे. "पर्यावरण हे संस्कृतीला घडविते की, संस्कृती पर्यावरणाला घडविते. बदल किंवा परिवर्तन याबाबतीत संस्कृती व पर्यावरण यांच्यात जो कार्यकारणभाव संभवतो किंवा गृहीत धरला जातो, तो कार्यकारणभाव कोणत्या अर्थाचा असतो हे किंवा यासारखे प्रश्न प्रथम पुढे करण्यात आले."[१] माणसाच्या आयुष्यातला वानप्रस्थाश्रम त्यासाठीच होता की काय असे दिसून येते.

प्राचीन काळापासून मराठी साहित्यात वृक्षांची निगा कशी राखावी, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व याचे बरेचसे उल्लेख पहावयास मिळतात. भारतीय संस्कृतीत काही वृक्षांची जपणूकच नव्हे : तर त्यांची पूजाही केली जाते. त्यात वड, पिंपळ, उंबराचे झाड, तुळस या वृक्षांचा समावेश होतो. काही वृक्ष, फुले, पाने, फळे यांच्यात औषधी गुणधर्म असतात. याची नोंद आयुर्वेदातील काही ग्रंथांच्या माध्यमातून बघावयास मिळते. भारतीय संस्कृतीत 'तुळस' या वृक्षाला फार महत्त्वाचे स्थान आहे. संत साहित्यातील संत तुकाराम आणि संत नामदेव यांनी आपल्या अभंगातून तुलसी महात्म्याचे वर्णन केले आहे. या संदर्भात संत तुकोबा आपल्या एका अभंगात म्हणतात.

**"आम्हा अलंकार मुद्रांचे शृंगार ; तुळसीचे हार वाहों कंठी"** [२] ( अ. क्र. १६९९ )

तर संत नामदेवराय आपल्या अभंगात तुळशीचे वर्णन करताना म्हणतात ;

**"तुळसी मंजिरीचे भाले | देखोनि यमदूत पळाले"** [३] (अ. क्र. ११७३ )

संत नामदेव तुळशीला औषधी वनस्पती असे म्हणतात. ती विष्णूलाही प्रिय आहे. साक्षात पांडुरंग ही तुळशीमाळ गळयात घालून विटेवर दिमाखात उभा आहे. 'तुळशीमाळा घालूनी कंठी, उभा विटेवरी जगजेठी' याप्रमाणे तुळशीचा महिमा सर्वत्र वरून वर्णन केला जातो. मानव आणि निसर्ग म्हणजेच "संत साहित्य आणि पर्यावरण" यांचा फार घनिष्ठ संबंध असल्याचे बघावयास मिळते. त्यातही मराठी कवितेमधून विषमतावादी पर्यावरण वाटपाचे व बदलत्या निसर्गाचे चित्रण झालेले पहावयास मिळते. झाडाझुडपांवर, वृक्षवेलींवर मनापासून प्रेम करणारे कवी, साहित्यिक संत साहित्याच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व मांडतात. हे निसर्गप्रेमी कवी, साहित्यिक निसर्गाशी इतके समरस होतात की, ते वृक्षवल्लींना आपले सखे-सोबती आपल्या कुटुंबातील सदस्यासारखेच समजतात. इ. स. च्या बाराव्या-तेराव्या शतकापासून महाराष्ट्राला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, गोरा कुंभार, संत सेना न्हावी, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, आद्य कवयित्री महदंबा, संत बहिणाबाई, कान्होपात्रा अशा अनेक थोर संतांची परंपरा लाभली आहे. या सर्व संत महात्म्यांनी पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मराठी काव्यात आपल्या ओवी, अभंग, श्लोक, पदे, गीतकाव्य रचना यांच्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आहे. माणसाला शांतताप्रिय, स्वतंत्र, निर्भेळ

कोरोनाचे भयंकर संकट निर्माण झाले आहे. याचा कुठेतरी पर्यावरणाशी आपण समतोल बिघडवला. त्यामुळे हे संकट आज संपूर्ण मानव जातीवर ओढवले आहे. पर्यावरण आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. कारण या पर्यावरणातूनच मानवाला आवश्यक असलेल्या गोष्टी प्राप्त होतात. उदा. जसे ऑक्सिजन, इंधन, पाणी, फळे, फुले, वृक्ष, अन्नधान्यासाठी लागणारे आवश्यक घटक, घर बांधकामासाठी लागणारे लाकूड या सर्व गोष्टी आपल्याला पर्यावरणामुळे म्हणजेच निसर्गामुळे मिळतात. मानवाचे जीवन हे पंचतत्वावर अवलंबून आहे जसे की भूमी, जल, अग्नी, आकाश आणि वायू. तरी देखील आपण याच निसर्गाला पुन: पुन्हा आव्हान देतो. त्याच्याशी मानव प्रतारणा करतो. पाच जूनला पर्यावरण दिवस फक्त शोभा म्हणून, एक देखावा म्हणून साजरा केला जातो. झाडांचे संवर्धन, भरण-पोषण हे ३६५ दिवस करणे म्हणजे खरे पर्यावरण संवर्धन होय. केवळ एक दिवस शोभेचा पाहुणा बनून रोप लावणे म्हणजे "पर्यावरण दिन" होत नाही. आपल्या परिसरात, घराच्या अंगणात एक तरी झाड लावणे आणि ते वाढविणे म्हणजे खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धन करणे होय. नुसते झाड लावणे महत्त्वाचे नाही ; तर त्या झाडाचे संवर्धन, भरण-पोषण करणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीने जास्तीत जास्त झाडे लावून या धरतीमातेला सुजलाम-सुफलाम बनविले पाहिजे. हीच आज खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धनाची खरी गरज आहे ; तेव्हाच खऱ्या अर्थाने सर्व संत कवींच्या, साहित्यिकांच्या कार्याला खरी मानवंदना मिळेल असे मला वाटते.

**संदर्भ टीपा -**

१) प्रा. जाधव रा. ग. 'पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस- पुणे, प्र.आ.,१९९६, पृ. १८

२) वै. जोग महाराज व ह.भ.प. देवडीकर पारायण पद्धतीनुसार, 'सार्थ श्री. तुकाराम गाथा', जानेवारी -२०१७. (अभंग क्र. १६९९)

३) डॉ. सोमण कमलेश, 'मराठी वाङमय रसग्रहण आस्वादन, केंद्रीय लोकसेवा आयोग, पेपर क्रमांक-२, ( ११७३ ). पृ. २४९

४) वडखेळकर शांतिजीवन, 'ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी', ऑनलाईन प्रत, साप्ताहिक - 'श्रद्धा संस्कृती', २५ सप्टेंबर २०१३, (१४/२३३)

५) ॲड. मोळक शैलजा (संपा), 'जगद्गुरू श्री. संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ', लेख - डॉ. वाकोडे मधुकर. 'गणगोत संतश्रेष्ठ तुकोबांचे', जिजाऊ ग्रंथालय - पुणे, प्र. आ..फेब्रुवारी- २००९, पृ. १४३

६) तत्रैव. लेख - डॉ. गरसोळे सुरेश, 'तुकोबांचे डोळस पर्यावरण दर्शन', पृ. १४५

७) डॉ. करंबेळकर उमेश. मैत्री - २०१२, मराठी संत साहित्यातील निसर्ग', ऑनलाईन प्रकाशन - २६ फेब्रुवारी २०१९.

८) ॲड. मोळक शैलजा ( संपा.). उ. नि. ५, लेख - डॉ. पोतदार माधव, 'आम्हां घरी धन'... पृ. ११२

९) डॉ. ईर्लेकर सुहासिनी, 'आद्य मराठी आत्मचरित्रकार : संत नामदेव', स्नेहवर्धन प्रकाशन- पुणे. प्र.आ.,ऑगस्ट-२०११. पृ. ९

१०) नसिराबादकर ल. रा., 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास', फडके प्रकाशन- कोल्हापूर, सा.आ., २००३, पृ. १४३

११) ॲड. मोळक शैलजा, ( संपा.), उ. नि. ५. लेख - ह.भ.प. पाटील प्रदिप, 'संत तुकाराम एक अर्थतज्ञ', पृ. २५९

१२) नसिराबादकर ल. रा., उ. नि. १०, पृ. ७८

१३) परब सचिन / गायकवाड श्रीरंग (संपा.), 'जनाई', लेख- कामत अशोक, 'पंधरावी ती जनी', अक्षर प्रकाशन- आजरा, प्र. आ., एप्रिल २०१६, पृ. १६१

१४) शेणोलीकर ह. श्री., 'नामदेव गाथा', साहित्य अकादमी- न्यू दिल्ली, पुनर्मुद्रण - २०१२, पृ. १४७

१५) नसिराबादकर ल. रा., उ.नि. १०, पृ. ८०

१६) देशपांडे अ.ना. / जोशी म. रा., 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास' भाग-२, जाने. १९९६, दु.आ., पृ. १६४

१७) दखणे रामचंद्र. ,'संत साहित्यातील पर्यावरण विचार', पद्मगंधा प्रकाशन – पुणे, प्र.आ., १९९४. पृ. ८